# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः21.07.2024** **वारःरविवार**

---

- केंद्र सरकारच्या धाडसी निर्णयांमुळे सहकार आणि कृषी क्षेत्र अधिक बळकट झाल्याचं केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचं प्रतिपादन.
- भारतीय जनता पार्टीचं आज पुण्यात महाअधिवेशन.
- छत्तीसावा पुण्यभूषण पुरस्कार संगणक तज्ज्ञ डॉक्टर विजय भटकर यांना प्रदान.

  आणि
- राज्यात ठिकठिकाणी मुसळधार पाऊस; जनजीवन विस्कळीत. आजही जोरदार पावसाचा अंदाज.

**मोहोळ**

सहकार क्षेत्रासाठी नवीन मंत्रालय स्थापन करून केंद्रातील मोदी सरकारने गेल्या 10 वर्षात जे सकारात्मक आणि धाडसी निर्णय घेतले त्यामुळे कृषी आणि सहकार क्षेत्र अधिक बळकट होत असल्याचं केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे. पुण्यातील वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेच्या वार्षिक पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते काल बोलत होते. संस्थेमधील कृषी आणि कृषी क्षेत्राशी संलग्न अभ्यासक्रमाच्या 32 व्या तुकडीतील 99 विद्यार्थ्यांना या वेळी मोहोळ यांच्या हस्ते पदव्युत्तर पदविका प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.सहकार क्षेत्राला कुशल मनुष्यबळाची लागणारी गरज वैकुंठ मेहता सहकार व्यवस्थापन संस्था अतिशय प्रामाणिकपणे आणि प्रभावीपणे पार पाडत असल्याचं सांगताना ; देशाचा सहकार वृध्दींगत करण्यात प्रशिक्षित तरुणांची भूमिका फार महत्वाची ठरणार असल्याचं मोहोळ यावेळी म्हणाले.

**वैष्णव**

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल पुणे रेल्वे स्थानकाची पाहणी केली आणि स्थानकात उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती घेतली. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की या स्थानकावरील सुविधा आणि क्षमता कशा वाढवता येतील यावर पाहणीदरम्यान चर्चा झाली. उरळी स्थानकाला मोठं टर्मिनल म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेतला असल्याचंही वैष्णव म्हणाले.

**भाजपा**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज पुण्यात भारतीय जनता पक्षाचं महाअधिवेशन होत आहे. या अधिवेशनात 5300 पदाधिकारी सहभागी होणार असल्याची माहिती भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत दिली. पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या भाषणाने या महाअधिवेशनाचा समारोप होणार आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यभर काढल्या जाणाऱ्या संवाद यात्रांच्या आराखड्याला यावेळी अंतिम स्वरूप दिलं जाण्याची शक्यता आहे .

**भटकर**

भविष्याचा वेध घेतला असता उच्च शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रीत केल्यास प्रगतीचा वेग वाढेल, असं मत इन्फोसिसचे संस्थापक- अध्यक्ष एन.आर. नारायण मूर्ती यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि संगणक तज्ज्ञ डॉक्टर विजय भटकर यांना संगणकशास्त्र क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल 2024 चा पुण्यभूषण पुरस्कार प्रदान करताना ते बोलत होते. कोणत्याही प्रगतीच्या टप्प्याचा पाया एका अशक्य वाटणाऱ्या स्वप्नात दडलेला असतो. समर्पण, कष्ट करण्याची तयारी आणि सातत्य या मूल्यांच्या बळावर आपण ते स्वप्न प्रत्यक्षात आणू शकतो असंही नारायण मूर्ती म्हणाले. या पुरस्काराचं यंदा छत्तीसावं वर्ष आहे. रायफलमन मिन बहाद्दूर थापा,  शिपाई दीपक बर्मन, लान्स नाईक अभिजीत पाटील, शिपाई तपस कुमार रॉय आणि वीरपुत्र कुणाल राजेंद्र बारपट्टेची आई वीरमाता विद्या बारपट्टे यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

**पाऊस**

राज्यात काल अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस पडला. संततधार पावसाने कालही मुंबईला झोडपून काढले. गडचिरोली जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे नद्या आणि नाल्यांना पूर आला असून, 27 मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली आहे. भामरागडनजीकच्या पर्लकोटा नदीला पूर आला आहे. त्यामुळे भामरागड- आलापल्ली मार्गावरील वाहतूक बंद झाली आहे. नागपूरच्या सखल भागात पाणी साचल्याने नगरिकांना अडचणीना तोंड द्यावं लागलं.भंडारा जिल्ह्यातील गोसेखुर्द धरणाचे 27 दरवाजे उघडण्यात आले असून 3033 क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला असून आणखी विसर्ग वाढणार असल्याने नदीकाठावरील गावांना सतर्कतेचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे. तर नागपूर रायपूर महामार्गावरील वैनगंगा नदी जवळील कारधा पथकर नाक्याजवळ दरड कोसळल्यानं महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती . रायगड जिल्ह्यातील सर्व नद्यांना पूर आले असून रोह्यात कुंडलिका नदीनं धोक्याची पातळी ओलांडली आहे. रोह्याजवळ भिसे खिंडीत दरड कोसळली आहे. परभणी जिल्ह्यात शेतशिवारातील सोयाबीन,कापुस,तुर,मूग,उडीद,तीळ आदी पीक चांगले जोमात वाढलेले दिसून येत आहे. कोल्हापुरातील पंचगंगा नदीची पाणी पातळी इशारा

पातळीजवळ असून संभाव्य पूर परिस्थिती लक्षात घेता प्रशासकीय यंत्रणेने सतर्क रहावे, अशा सूचना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी दिल्या आहेत. मुंबईमधील तुळशी तलाव पूर्ण भरला असून मुंबईला पाणी पुरविणाऱ्या सातही तलावांत 40 पूर्णांक 99 टक्के पाणीसाठा उपलब्ध झाला असून सप्टेंबर अखेरपर्यंत मुंबईची तहान भागेल अशी माहिती मुंबई महापालिकेच्या जल अभियंता विभागानं दिली आहे. गडचिरोली तालुक्यातील पोटेगाव नजीकच्या कुंभी नाल्याच्या काठावर काही शेतकरी अडकले होते. आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या चमूने बोटीच्या साहयाने त्यांनी सुटका केली. अमरावती जिल्ह्यात अनेक गावांमध्ये  पावसाचे पाणी घरात शिरले असून नदी नाले, दुथडी भरून वाहू लागले आहेत. जिल्हा प्रशासनाच्यावतीने नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यात गेल्या चार दिवसात जोरदार पाऊस झाला आहे. यामुळे दोंडाईचा शहरासह शिंदखेडा तालुक्यातील चिलाने आणि परिसरात शेतीसह रहिवाशांच्या घरात पाणी शिरून मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. रत्नागिरी जिल्ह्यात काल रात्री खेड तालुक्यातल्या जगबुडी नदीनं धोका पातळी ओलांडली आहे. राजापूर तालुक्यातली कोदवली नदी इशारा पातळीवरून वाहत आहे. अन्य नद्यांची पाणीपातळीही वाढली आहे; मात्र त्यांनी अद्याप इशारा पातळी गाठलेली नाही. रत्नागिरी जिल्ह्यात शेतीसाठी पारंपरिक घटकांचा वापर करताना आवश्यकतेनुसार आधुनिक पद्धतीचा अवलंब बळीराजाकडून होताना दिसत आहे. ऐकूया याबाबतचा अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून .. . . . . .

**जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून रत्नागिरी जिल्ह्यात सुरू झालेला पाऊस आतापर्यंत सुरूच आहे. त्यामुळे खाचरांमध्ये लगबग असून, भातलावण्या अंतिम टप्प्यात आल्या आहेत. दुर्गम किंवा शहरांपासून लांब अंतरावर असलेल्या गावांचा अपवाद वगळता बैलांचा नांगर फिरत असल्याचं चित्र आता इथे दुर्मीळ झालं आहे. कारण चिखलणीसह शेतीच्या अनेक कामांसाठी पॉवर टिलरचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जाऊ लागला आहे. शेतीचं आणि गाई-गुरं बाळगण्याचं मुळातच घटत चाललेलं प्रमाण, शेतमजुरीसाठी माणसांची असलेली वानवा, सगळ्याच प्रकारच्या खर्चात होत असलेली वाढ आणि पॉवर टिलरसाठी मिळणारं अनुदान अशा अनेक गोष्टींमुळे नांगराचा वापर खूपच कमी झाला आहे. कोकणात शेतीचं यांत्रिकीकरण होण्याला मर्यादा असल्या, तरी काळानुसार इथला शेतकरी पॉवर टिलर, ग्रासकटर यांसारख्या उपकरणांचा बऱ्यापैकी वापर करू लागला आहे. यामुळे सोय होते हे अगदी खरं असलं, तरी यंत्रांसाठी इंधन, शेतीसाठी खत या गोष्टींसाठीचं परावलंबित्व वाढल्याने शेतीचा नैसर्गिक आत्मा हरवत असल्याची अनेक शेतकऱ्यांची भावना आहे. गाई-बैल असताना शेणखत मिळायचं, शेतीसाठी इंधनाचा खर्च नव्हता, दूधदुभतं असायचं आणि गवताचा गुरांना चारा म्हणून उपयोग व्हायचा. हे चक्र काळानुसार खंडित होत चाललं आहे. हा बदल चांगला की वाईट, यावर दोन्ही बाजूंनी अनेक मुद्द्यांसह चर्चा करता येईल; मात्र अनेक अडचणी असल्या, तरीही शेतीच्या परंपरेत खंड पडू द्यायचा नाही, यासाठी राबणाऱ्या शेतकऱ्यांनी यांत्रिकीकरणाचा मार्ग अनुसरला आहे, असं म्हणायला हरकत नाही.**

**गुरुपौर्णिमा**

आज राज्यात सर्वत्र गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. यानिमित्त विविध ठिकाणी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. शिर्डीइथल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्यावतीने आयोजित केलेल्या श्री गुरुपौर्णिमा उत्सवाला काल सुरुवात झाली. अमेरीकेचे वाणिज्य महादुतावासमधील अधिकारी माईक हॅंकी श्री साईबाबांच्या मध्यान्ह आरतीला उपस्थित होते.

**प्रकाशन**

मंदिर स्थापत्य आणि मूर्तीशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉक्टर गो. बं. देगलूरकर हे आधुनिक युगातील ऋषीपरंपरेचे पाईक असल्याचे गौरवोदगार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत यांनी काल पुण्यात काढले. देगलूरकर संशोधित आणि लिखित 'अथातो बिंब जिज्ञासा' या मराठी ग्रंथाचं प्रकाशन करताना भागवत बोलत होते. डॉक्टर देगलुरकर यांचा ग्रंथ राष्ट्रजीवन, ज्ञानपरंपरेकडं पाहण्यासाठी सकारात्मक दृष्टी देणारा असल्याचंही भागवत यावेळी म्हणाले. आशुतोष बापट यांनी मूळ इंग्लिश पुस्तकाचा मराठी अनुवाद केला आहे.

**कबड्डी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेच्यावतीनं पुण्यात आय़ोजित 71 व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत पुरुष आणि महिला गटात पुणे ग्रामीण संघानं दुहेरी मुकुटाचा मान पटकावला. पुरुष विभागात पुणे ग्रामीण संघाने अहमदनगर संघाचा 36-35 असा पराभव करीत श्रीकृष्ण करंडक पटकाविला. तर महिला गटात पुणे ग्रामीण संघानं रत्नागिरी संघावर 28-24 असा विजय मिळवित पार्वतीबाई सांडव चषक पटकाविला.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज तर किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता  हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमी संपलं , नमस्कार.**